# भारतीय जनता पार्टी - शिवसेना युती

१, जलाराम नगर, वल्लभबाग लेन, गांधी मार्केट समोर, घाटकोपर (पूर्व),
मुंबई - ४०० ०७४ टेलिफोन : २५१४ ९९७८, २५१४ ७८८९


कृपया प्रसिद्धीसाठी ३० मार्च २००९

## विराट कार्यकर्ता मेळाव्या किरीट सोमैया यांच्या प्रचाराचा प्रारंभ

केंद्रातील यु.पी.ए. सरकारचे पापाचे घडे भरले असुन आगामी निवडणूकीत देशातील व मुंबईतील जनता हे कॉंग्रेस यु.पी.ए. चे सरकार उलथून टाकेल व श्री लालकृष्ण आडवाणी यांच्या नेतृत्व खाली एन.डी.ए. केंद्रात सत्तेवर येईल असे उद्‌गार शिवसेना नेते व माजी मंत्री ॲड.लीलाधर डाके यांनी काल भांडुप येथे काढले.

ते भांडुप मधील कोकणनगर येथे भारतीय जनता पार्टी-शिवसेना युतीने आयोजित केलेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते.

या प्रसंगी ईशान्य मुंबईतील युतीचे उमेद्वार श्री किरीट सोमैया यांच्या प्रचाराचा नारळ ॲड. लीलाधर डाके, मुंबई भाजपा अध्यक्ष श्री गोपाळ शेट्टी, शिवसेना उपनेत्या श्रीमती नीलम गोरे व आ. प्रकाश महेता, सरदार तारासिंग यांच्या हस्ते वाढविण्यात आला.

युतीच्या कार्यकर्त्यांच्या या विराट मेळाव्यात बोलताना श्री किरीट सोमैया यांनी कॉंग्रेस-राष्ट्रवादी प्रणित केंद्र व राज्य सरकार यांचे वाभाडे काढले, ते म्हणाले की, २००४ साली यु.पी.ए. सरकारने २.५० कोटी लोकांना नवीन रोजगार उपलब्ध करुन देऊ असे आश्वासन दिले होते. मात्र, चुकीचा आर्थिक नितीमुळे नविन रोजगार राहीला बाजुला, आर्थिक मंदी आली व उलट एक कोटी लोक बेराजगार झाले.

वाढलेल्या महागाईचे उदाहरण देंताना साखर,गहु,दुध यांची पॅकेटस दाखवत सोमैया यांनी उपस्थितांची मने जिकूंन घेतली. आयात केलेल्या सडक्या लाल गव्हाचे पॅकेट जेव्हा सोमैयांने दाखवली तेव्हा ‘निकम्मे सरकार को हटा दो“अशी उस्फुर्त दाद उपस्थितांनी दिले.

निवडुण आल्यानंतर एका वर्षात आपण लोडशेडींग बंद करु, मध्य रेल्वेच्या प्रवासात सुधारण घडवून आणु, १७ जिवनावश्यक वस्तुंचे भाव नियंत्रित करु व वन जमीनींवर राहात असलेल्या जनतेना सुरक्षा एवं न्याय मिळवून देऊ असे आश्वासन किरीट सोमैया यांनी दिली.

या मेळेव्यात श्रीमती निलम गोरे,आ. प्रकाश महेता, श्री सरदार तारासिंग, श्री दत्ताराम गुजर, भाजपा ईशान्य मुंबईचे अध्यक्ष श्री भरत पारेख यांना कार्यकर्त्यांचा मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन भाजपाचे ईशान्य मुंबईचे महामंत्री श्री श्रीनिवास त्रिपाठी यांनी केल.

**दयानंद नेने**
(9004028575)



ईशान्य मुंबई उमेदवार : श्री किरीट सौमेया